# ग्रामपंचायत व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
# जिल्हा परिषद कोल्हापूर.
# पंचगंगा नदीखोरे प्रदूषण माहे फेब्रुवारी २०१८ अखेरचा त्रैमासिक अहवाल

पंचगंगा प्रदुषण निर्मुलन कार्यक्रमा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत पहिल्या टप्प्यातील ३८ गावापैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत नाबार्ड अंतर्गत मंजुर ८ गावांचा सांडपाणी व्यवस्थापन वगळून ३० गावांचा सांडपाणी व ३८ गावांचा घनकचरा व्यवस्थापनाचा कायम स्वरुपी उपाय योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल मा.विभागीय आयुक्त यांनी दि.२० मे २०१७ च्या आढावा बैठकी दरम्यान दिलेल्या सुचनेप्रमाणे तयार करणेत येवून पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांना दि. १ जून २०१७ अन्वये मंजुरीसाठी व निधी उपलब्धतेसाठी सादर केलेला आहे, तसेच त्याबाबत संबंधीत विभागाकडून मंजुरी अथवा निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही न झालेने पंचगंगा प्रदुषणाबाबतची मा.उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका क्र. १८३/२०१२ दाखल असलेने तसेच सदर विषय संवेदशिल असलेचे गांभिर्य पाहता या प्रकल्पास मंजुरी मिळून निधी उपलब्ध करुन देणेबाबत दि.२८-११-२०१७ अन्वये फेर स्मरणपत्र देवून विनंती केलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत नाबार्ड अंतर्गत १५००० पेक्षा जादा लोकसंख्येची मंजुर ८ गावांपैकी शिरोली पु.ता.हातकणंगले या एका गावास कामाचा आदेश देणेत आलेला आहे, व शिरोळ ता.शिरोळ या गावांस सांडपाणी प्रकल्पास शासनास मार्फत गायरान जागेस मंजुरी देणेत आलेली आहे. याचप्रमाणे उर्वरीत ८ गावांस देखील तांत्रिक दृष्टया उचीत गायरान जागा / खाजगी जागांचे प्रस्ताव सादर करुन त्यास मंजुरी घेणेबाबत व त्याठिकाणी सांडपाणी प्रकल्प राबवून पंचगंगा प्रदुषण रोखणेबाबत वारंवार कळवलेले आहे. तसेच याबाबत संबंधीत ग्रामपंचायत / गट विकास अधिकारी यांच्या सोबत केलेला पत्रव्यवहार, अढावा बैठका, जागेचे प्रस्ताव अभिप्रायाचा अहवाल सादर करणेकरिता देखील कळवलेले आहे.

कोल्हापूर जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण भागामध्ये NBA अंतर्गत शैचालयाचे ९८% काम झालेले आहे. तसेच कायम स्वरुपी उपाय योजनांबाबतचा प्रकल्पास अदयाप मंजुरी अथवा निधी उपलब्ध न झालेने मा.उच्च न्यायालयाने Interim order प्रमाणे ग्रामपंचायत स्तरावरुन तात्पुरत्या उपाय योजना करणेत येताता १) यामध्ये सदर ३८ गावांतील नागरिकामध्ये मुलभूत कर्तव्य जबाबदारीसाठी जनजागृतीसाठी प्रभात फेरी / पथनाट्टे / महिला मेळावे इ. पहाणेत येते.

२) सार्वजनिक उत्सवा दरम्यान मागील सलग तीन वर्षापासून घरगुती / सार्वजनिक श्रीगणेश मुर्ती व निर्माल्य विर्सजन नदी पात्रामध्ये न करता पर्यायी तात्पुरत्या सोयी करुन त्यामध्ये करणेत येते.

३) बहुतांशी गावांमध्ये नदी पात्रामध्ये रक्षा विर्सजन न करणेचे अवाहन करुन शेतामध्ये रक्षा विर्सजन केलेस काही गावांमध्ये प्रोत्साहन अनुदान देखील दिले जाते.

४) गावांच्या मुख्यवर्ती भागांमध्ये तसेच नदीकडे जाण्याच्या मार्गावर सुचना फलक लावून मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या सुचनांचे पालन करणेबाबत आदेशित केले आहे.

५) वरील सर्व गावांमध्ये घनकचरा घंटागाडी / ट्रॉली इ. मार्गाने गोळा केला जातो व खत खड्डे करुन खतांसाठी टाकला जातो अथवा गांवातील खण इ. ठिकाणी जमा केला जातो.

६) सदर गावांमध्ये ग्रामपंचायत स्तरावर तात्पुरते कच्चे बंधारे घालून अथवा खड्डे करुन सांडपाणी अडवले जाते व त्यांचा शेतीसाठी पुर्नवापर केला जातो. पहिल्या टप्यातील ३८ गावांमधील अंदाजप १८.० MLD सांडपाणीपैकी साखळी बंधारे, शोष खड्डे , स्थिरीकरण तळे इ.मार्गाने अंदाजे १३.२५ MLD सांडपाणी अडवलेले आहे.

वरील सर्व तात्पुरत्या उपाय योजना करुन ग्रामपंचायती स्तरावर बहुतांशी प्रमाणात सांडपाणी / घनकचरा व्यवस्थापन करणेत येवून प्रदुषण टाकले जाते व नदीचे पावित्र्य राखणेसाठी प्रयत्न केला जातो.